# प्रेसनोट

दि. ३१/१०/२०२४

## ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पुणे पोलीस आयुक्तालयातील हडपसर पोलीस स्टेशनचे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक याना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतले.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ६४ वर्ष |
| आरोपी नाव व कार्यालय | शरद दशरथ कणसे, पद - श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- रुपये मुळ लाच मागणी, त्यापैकी अगोदरच ५,०००/- रुपये स्विकारले असून, उर्वरित २०,०००/- रुपये लाच मागणी |
| पडताळणी अंती लाच मागणी रक्कम | २०,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- (दहा हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | दि. ३१/१०/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. ३१/१०/२०२४ |
| ठिकाण | हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार व त्यांचा मुलगा यांचेविरुद्ध कलकत्ता ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट यांनी वॉरंट काढले असून, सदर वॉरंट बजावणीकामी हडपसर पोलीस स्टेशन येथील लोकसेवक शरद कणसे यांच्याकडे देण्यात आले होते. सदर वॉरंटमध्ये तक्रारदार व त्यांचा मुलगा यांना अटक न करण्यासाठी लोकसेवक शरद कणसे यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रुपये लाच मागणी करुन त्यातील ५,०००/- रुपये अगोदरच घेवून उर्वरित लाचेच्या रकमेसाठी तगादा लावून वारंवार अटक करण्याची धमकी देत असल्याबाबतची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक शरद कणसे यांनी तक्रारदार यांचेकडे वरील कामासाठी उर्वरित २०,०००/- रुपयाची लाच मागणी करुन, लोकसेवक शरद कणसे यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये १०,०००/- (दहा हजार) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले असता त्यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक अमोल भोसले तपास करत आहेत.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in



दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.